Rotary | CREATE HOPE in the WORLD

RI 3131
RIY 2023-24

शक्रांगण

# सन्मानपत्र

।। दिव्यत्वाची जेथे प्रचिती । तेथे कर माझे जुळती ।।

मान्यवर **डॉ.गणेश राऊत** यांस,

रोटरी या आंतरराष्ट्रीय सेवाभावी स्वायत्त संस्थेचे एक अंग असलेले रोटरी जिल्हा ३१३१ तर्फे आज दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी, डॉ.गणेश राऊत, पुणे यांना व्यावसायिक गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे . महाराष्ट्र राज्य हे नेहमीच सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रात अग्रेसर राहिले आहे. अशा राज्यातून शैक्षणिक क्षेत्रात अनेक मान्यवरांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. आपण अशाच अनमोल रत्नांपैकी एक.

श्री.गणेश राऊत आपण आपली कारकीर्द इतिहास या विषयात घडवली आहे. आपण इतिहास विषयात Ph.D प्राप्त केली.आणि डॉक्टर गणेश राऊत म्हणून ओळखले जाऊ लागलात. एका मध्यमवर्गीय कुटुंबातून येऊन आज आपण शिक्षण क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. सध्या आपण हरिभाई व्ही. देसाई महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य आणि इतिहास विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत आहात.

२६ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आणि इतिहास विषयावरील आपले प्रेम यातूनच आपल्याकडून इतिहासातील ९ संदर्भ पुस्तके लिहिली गेली, तसेच इतिहासातील आणखी १६ पुस्तकांचे आपण संपादन केले. पुणे विद्यापीठातील पत्रकारिता या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आपण मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शकआहात. महाविद्यालयात आपण अनेक अल्प-मुदतीचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत, यामध्ये पत्रकारितेतील सर्टिफिकेट कोर्स, फोर्ट गाइड कोर्स, हेरिटेज वॉक, मोडी लिपी इत्यादींचा समावेश आहे ज्यामुळे विद्यार्थ्यांना हे अभ्यासक्रम फायद्याचे ठरले.

आपण महाविद्यालयातील स्पर्धापरीक्षा केंद्रचे समन्वयक, बालभारतीच्या अभ्यास मंडळाचे सदस्य आहात. महाराष्ट्र बोर्डाच्या विविध मानकांसाठी अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके तयार करण्यात आपला सहभाग आहे. आपण पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या ''दत्तक गावांचा इतिहास'' या ग्रंथांचे संकलन व संपादन केले आहे. तसेच तीन दिवाळी मासिकांचे मुख्य संपादक आहात.आपल्या इतिहासावरील प्रेमापोटी आणि त्याच्या प्रगत अभ्यासासाठी लंडन आणि दुबईला भेट दिलीत. आपणांस सामाजिक उपक्रमांची उत्तम जाण आहे, आणि म्हणूनच 'दिशा डेव्हलपमेंट ट्रस्ट, पुणे' चे संस्थापक विश्वस्त आहात. आपणास आजतागायत अनेक संस्थांनी अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. आपला मुक्त साहित्यिक, पत्रकार, संपादक, प्राचार्य म्हणून शैक्षणिक क्षेत्रातील प्रवास थक्क करणारा आहे.

आपण केलेल्या ह्या महान कार्यामुळे आम्हा सर्व रोटेरियन्सना आपला सार्थ अभिमान वाटतो.
आपणांस हे सन्मानपत्र सविनय प्रदान करताना आम्हास खूप आनंद होत आहे.

आपल्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा !

आपले नम्र

**रोटरी क्लब ऑफ पुणे**

**युवा, कर्वेनगर, कॅम्प, सिनर्जी, लोकमान्यनगर, बिबवेवाडी, वारजे**